संदर्भ : मा. मुंबइ उच्च न्यायालय यांचे दि.१४.०३.२०२० चे Coronavirus (2019-Ncov) संदर्भातील निर्देश.

. . .

# पक्षकार व विधिज्ञ यांना विशेष सूचना

१. अगदीच आवश्यकता असल्याखेरीज कुठल्याही पक्षकारास कुठल्याही प्रकरणाध्ये न्यायालयात हजर राहण्यास सांगितले जाणार नाही.

२. पक्षकार व विधिज्ञांनी गर्दी टाळावी.

३. सर्व विधिज्ञांनी आपल्या पक्षकारास सल्ला द्यावा की, न्यायालयाने त्यांना उपस्थित होण्याचे आदेश दिल्याखेरीज अथवा त्या पक्षकाराची हजेरी अत्यावश्यकच असल्याखेरीज पक्षकारांनी न्यायालयात येवू नये.

४. सद्य स्थितीत जोपर्यंत सुधारणा होत नाही तोपर्यंत गैरउपस्थितीच्या कारणावरुन संबंधीतांचे विरुध्द प्रतिकूल आदेश पारीत केले जाणार नाहीत.

५. पक्षकार/विधिज्ञ/साक्षीदार यांच्या मुदतवाढीच्या विनंतीचा योग्य तो विचार केला जाईल.

६. फौजदारी प्रकरणात आरोपीतांची अनुपस्थिती माफ करण्याबाबत योग्य ते निर्णय घेतले जातील.

७. शक्य असल्यास दिवाणी प्रकरणात दोन्ही बाजुने संमती दिल्यास पुरावा नोंदवण्यासाठी स्थानिक कमिशनरची नेमणूक होऊ शकेल.

८. पुरावा नोंदण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सचा जास्तीत जास्त उपयोग केला जाईल.

९. संपरीक्षाधीन कैदी, कच्चा कैदी (under-trial prisoner) यांना कारागृहातून न्यायालयात आणण्याऐवजी व्हिडीओ कॉन्फरन्सींचा उपयोग केला जाईल.

१०. अंतिम युक्तिवादाच्या प्रकरणात,शक्यतोवर युक्तिवाद हा लेखी स्वरुपात दाखल करावा आणि तोंडी युक्तिवाद शक्य तेवढा मर्यादित ठेवावा.

११. पक्षकार, विधिज्ञ यांनी सॅनीटायझर्सचा वापर करावा. सर्वांनी प्रतिबंधात्मक खबरदारीचे सर्व उपाय योजावेत.

१२. सद्य स्थितीत सुधारणा होत नाही तोपर्यंत वकील संघाचे अध्यक्ष, सचिव, वकील यांनी न्यायालयात, न्यायालयाचे आवारात, इमारतीमध्ये, बार रुमध्ये गर्दी करु नये, गर्दी होऊ देऊ नये, त्याच प्रमाणे विशिष्ट सुरक्षीत हद्दी पालन करावे.

१३. पुढील आदेश होईपर्यंत कुठल्याही कार्यक्रमाचे/निवडणुकीचे आयोजन करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

१४. फक्त तातडीच्या प्रकरणामध्येच मध्यस्थी केंद्रामध्ये मध्यस्थी प्रक्रिया सुरु राहील.

सर्व संबंधितांनी वरील सुचनांचे अनुसरन, पालन करावे.

आदेशावरुन .....